दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २४२ वा गुरूवार दि.२१ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# राज्यातील सरकारी शाळांना सीबीएसई पॅटर्न लागू

मुंबई : राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच स्टेट बोर्ड शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढील लागावी या हेतूने सरकारने हा निर्णय घेतला आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात आज सभागृहात माहिती देत घोषणा केली. विशेष म्हणजे यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतरही त्यांनी राज्यात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यासंदर्भात आढावा सुरू असल्याचे म्हटले होते. राज्य अभ्यासक्रम आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संदर्भात सुकाणू समितीने मान्यता दिली असून मंत्री दादा भुसे यांनी विधान परीषदेतील प्रश्नावर लेखी उत्तर देत माहिती दिली. भाजप नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर दिले. राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली का? असा प्रश्न आमदार प्रसाद लाड यांनी विचारला होता. त्यावर, सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करुन दिली जाणार असून १ एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार असल्याचे उत्तर दादा भुसे यांनी दिले.

मुख्यमंत्र्यांनी केल्या होत्या सूचना

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला होता. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला होता. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी



पाऊले उचलावीत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. दरम्यान, त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना केल्या होता.

## राज्यात यंदाच्या वर्षी ४४ लाख क्विंटल कापसाची खरेदी

मुंबई : राज्यात यंदाच्या वर्षी १८ मार्च २०२५ रोजीपर्यंत सीसीआय म्हणजेच कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून ४४ लाख क्विंटल कापसाची खरेदी पूर्ण झाल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानपरिषदेत दिली.



सदस्य अभिजीत वंजारी यांनी अल्पकालीन चर्चे दरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री रावल बोलत होते. यावेळी सदस्य सदाभाऊ खोत, अमोल मिटकरी, परिणय फुके, अरुण लाड यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून राज्यात कापूस खरेदी केंद्र उघडण्यात येतात आणि त्यांच्याकडूनच कापसाची खरेदी केली जाते असे सांगून मंत्री रावल म्हणाले की, यंदा कापसाला लांब धाग्यासाठी ७ हजार ५२१ रुपये तर मध्यम धाग्यासाठी ७ हजार १२१ रुपये हमीभाव देण्यात येत आहे. कापूस खरेदीसाठी राज्यात १२४ खरेदी केंद्र सुरू करण्यात आली आहेत. कापूस खरेदीनंतर त्याच्या जिनींग आणि प्रेसिंगची प्रक्रिया केली जाते. त्यासाठी सप्टेंबर ते सप्टेंबर असा करार प्रेसिंगवाल्यांसोबत केलेले असतात. त्यामुळे कापूस खरेदी बंद नसल्याचे मंत्री रावल यांनी स्पष्ट केले. सोयाबीन संदर्भात बोलताना मंत्री रावल म्हणाले की, जवळपास ११ लाख २१ हजार टन सोयाबीन यंदा खरेदी करण्यात आले आहे. त्याशिवाय तूर, मुग, उडीद, हरभरा या पिकांचीही खरेदी हमीभावाने होत आहे. या पिकांनाही चांगला हमीभाव देण्यात येत आहे. शेतक-यांच्या उत्पन्नवाढीसाठी शासन कायमच प्रयत्नशील असून राज्यात सिंचन क्षमतेत वाढ करण्यात येत आहे. सिंचनाच्या चांगल्या सोयी निर्माण झाल्या पाहिजेत. तसेच खासगी बाजार समित्यांच्या बाबत धोरण राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याची माहितीही मंत्री रावल यांनी सभागृहात दिली.

## ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना २०२४ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

मुंबई : महाराष्ट्राचा सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेला २०२४ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना देण्याची अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.



याबाबत दिलेल्या निवेदनात मुख्यमंत्री म्हणाले, राम सुतार हे ज्येष्ठ शिल्पकार आहेत. त्यांचे वय सध्या १०० वर्ष असून अजूनही ते शिल्प तयार करण्याचे काम करीत आहेत. इंदू मिल येथे निर्माणाधीन असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती तयार करण्याचे कामही राम सुतार करीत आहेत.

या पुरस्कार निवडीबाबत १२ मार्च २०२५ रोजी निवड समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत राम सुतार यांचे नाव २०२४ च्या पुरस्कारासाठी मान्यता देण्यात आली. या पुरस्कारचे स्वरूप २५ लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह व शाल असे आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## गणेश एकडे यांचा वाढदिवस रोहिणी नऱ्हे - विरोळे उपविभागीय अधिकारी व त्यांच्या टीमने केला साजरा




लातूर :- लातूर उपविभागीय अधिकारी कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी गणेश एकडे यांचा १८ मार्च रोजी वाढदिवस असल्याने रोहिणी नऱ्हे - विरोळे उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी लातूर, यांनी व त्यांच्या टीमने वाढदिवसानिमित्त केक कापून, शाल व पुष्पगुच्छ देऊन अति उत्साहात साजरा केला. यावेळी नायब तहसीलदार सुधीर दादा देशमुख नायब तहसीलदार,ए के मुजावर सहाय्यक महसूल अधिकारी, ओम म्हेकरे महसूल सहाय्यक, शिंदे अण्णा, शैलेश साळुंखे व कार्यालयातील शिपाई, कोतवाल आदि उपस्थित होते.

## कोकणातील खनिजे अदानी, अंबानीला लुटता यावीत यासाठी शक्तीपीठ मार्गाचा अट्टाहास

पालघर : भारतीय जनता पक्षाचे सरकार लाडके उद्योगपती अदानीसाठी रेट कार्पेट टाकत आहे. मुंबईतील धारावी अदानीला विकली आहे, मुंबईतील महत्त्वाचे भखंड अदानीच्याच घशात घातले आहेत. नवी मुंबई विमानतळही अदानीलाच दिलेले आहे आणि आता पालघरपासून सिंधुदुर्गपर्यंतचा मोठा सागरी पट्टा सुद्धा भारतीय जनता पक्षाच्या सरकारने अदानीच्या घशात टाकण्याचा घाट घातलेला आहे. तसेच कोकणात सापडलेली मुबलक प्रमाणातील खनिजे अदानी, अंबानीला लुटता यावीत यासाठी हा शक्तीपीठ मार्ग बांधला जात आहे असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

पालघर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, शेतक-यांचा विरोध असताना, आवश्यकता नसतानाही भाजप सरकार नागपूर ते गोवा शक्तीपीठ मार्ग टाकत आहे. जेट्टीतून समुद्र किना-यापासून थेट सेंट्रल इंडियापर्यंत अदानी अंबानीला रेड कार्पेट टाकले जात आहे. गोव्यातील कोळसा आणि खनिजे यांचा व्यापर या दोन उद्योगपतींना सहज करता यावा आणि कोकणात सापडलेली मुबलक प्रमाणातील खनिजे अदानी, अंबानीला लुटता यावीत यासाठी हा शक्तीपीठ मार्ग बांधला जात आहे. कोकणी माणूस एकजूट करुन राहतो त्याला छेद देण्यासाठी व या लोकांना शांत बसवण्यासाठी सिंधुदुर्गातील वाचाळवीर मंत्री बेताल वक्तव्य करुन समाजात तेढ निर्मण करत आहेत. आता पालघरमध्येही असेच फासे टाकले जात आहेत, इथल्या जमिनी उद्योगपतींच्या घशात घातल्या जात आहेत. हा आदिवासी भाग आहे पण जमीन अधिगृहणामध्ये त्यांना दिलेल्या संरक्षणाची पायमल्ली सुद्धा केली जात आहे.



देवेंद्र फडणवीस २०१४ ते १९ पाच वर्ष मुख्यमंत्री होते नंतर फोडाफोडी करून २.५ वर्षे ते उपमुख्यमंत्री राहिले आणि आता पुन्हा मुख्यमंत्री बनले आहेत. केंद्रात आणि राज्यात भाजपाचे सरकार आहे, आता मोठे बहुमत मिळाले आहे पण राज्यात विदारक परिस्थिती आहे आणि त्याला फडणवीस सरकारच जबाबदार आहे. भाजपाच्या राज्यात शेतमालाला भाव नाही, शेतकरी कर्जबाजारी आहे, बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे, कायदा सुव्यवस्थेची वाट लागली आहे. महिला अत्याचार वाढत आहेत, नव्याने गँग पुढे येते आहेत. रेती गँग, कोयता गँग, आका, खोक्या गँगनी उच्छाद मांडला आहे.

सत्ताधारी पक्षातील गुंड खंडणी वसुली करताना दिसत आहेत. राज्य सरकारकडे विकास कामासाठी पैसे नहीत, अर्थसंकल्पात मोठी महसूली तुट आहे परिणामी उत्पन्न व खर्च यांचा मेळ बसत नाही. राज्य सरकामधील प्रमुख नेते नरेंद्र मोदींचे मोठे गुणगाण गात असतात या ट्रिपल इंजिन सरकारने दिल्लीत जाऊन राज्यासाठी स्पेशल पॅकेज आणावे पण या तिघांमध्ये ती धमक नाही असेही सपकाळ म्हणाले.

विधानसभेला आघाडी होती त्यामुळे पालघरमध्ये काँग्रेसचे उमेदवार देता आले नाहीत पण आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची ताकद नक्कीच वाढेल, असा विश्वास सपकाळ यांनी यावेळी व्यक्त केला.






## बी विभाग इमारत सूंदर परंतु मूलभूत सुविधा पासून वंचित

नवी मुंबई / प्रतिनिधी :- नवी मुंबई महानगरपालिका देशातील अतीशय सूंदर अशी पालिका म्हणून ओळखली जाते.नेरुळ येथे बीविभागाची अतिशय सूंदर अशी इमारत उभी राहिली आहे,जनतेची कामे जलदगतीने होण्यासाठी उपयुक्त अशी इमारत आहे,एखाद्याला महत्वाची झेरॉक्स करायची असेल तर खूपच दूर जावे लागते.सगळ्यात आश्चर्यजनक बाब म्हणजे इमारतीमध्ये महिला सिक्युरिटी यांना आपली वर्दी बदलण्यासाठी रूम नाही,त्यांची गैरसोय बघून संताप आला.वरिष्ठ अधिकारी यांचे ड्रायव्हर कार्यालय बाहेर उन्हात बसून असतात. एखादी महिला कार्यलयात महत्वाच्या कामासाठी आपल्या लहान बाळाला घेऊन आली तर बाळाला दूध पाजण्यासाठी हिरकणी कक्ष देखील नाही. याबाबत बी वॉर्ड अधिकारी जयंत जावडेकर यांना सम्पर्क साधला असता,कोणतेही ठोस उत्तर दिले नाही. याबाबत आयुक्तांनी लवकरात लवकर बी वॉर्ड मध्ये हिरकणी कक्ष तसेच महिला सुरक्षा रक्षक यांच्या साठी चेंजिग रूम आणि ड्रायव्हर साठी बैठक रूम व्यवस्था करावी अन्यथा शिवसेना आपल्या पद्धतीने उग्र आंदोलन करेल अशी माहिती समाजसेवक शिवसेना उपशहरप्रमुख सिध्दार्थ साळवी यांनी दिली आहे.

## संपादकीय....

# भारताची ताकद!

नवी दिल्लीतील सत्तेच्या दरबारात आपण 'आऊटसायडर' असल्याची भावना २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली होती. वर्षानुवर्षे दिल्लीत सत्तेत असणारे नेते, त्यांच्याभोवती असलेले सत्तेचे दलाल आणि पंचतारांकित चर्चा विश्वात वावरणारे विचारवंत यांच्यापासून मोदी दूरच राहिले होते. पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी दिल्लीतील धुरिणाचार्यांना संदर्भहीन केले आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातही दबदबा निर्माण केला. सार्क, एशियन, क्वाड (ऑस्ट्रेलिया, भारत, जपान, अमेरिका यांची संघटना) अशा वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताची एक वेगळी प्रतिमा निर्माण केली. आर्थिकदृष्ट्या सर्वात प्रबळ असे १९ देश आणि युरोपियन महासंघ यांचा समावेश असलेल्या जी-२० समूहाचे यशस्वी नेतृत्वदेखील भारताने केले आणि २०२३ मध्ये नवी दिल्लीत नेतृत्वाखाली शिखर परिषदही पार पडली. १९४७ पूर्वी आर्थिक विकास, हवामान बदल, जागतिक आरोग्य, दहशतवाद अशा अनेक विषयांवर मोदी यांनी भारताची स्वतंत्र भूमिका ठसठशीतपणे मांडली. आता पंतप्रधान मोदी यांनी लेक्स फ्रीडमन यांना दिलेल्या मुलाखतीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर मते व्यक्त केली आहेत. फ्रीडमन हे प्रसिद्ध अमेरिकन संगणकशास्त्रज्ञ आणि पॉडकास्टर आहेत. 'मॅसेच्युएटस् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'मध्ये (एमआयटी) शिकत असताना फ्रीडमन यांनी केलेल्या एका संशोधनपर अहवालाचे कौतुक 'टेस्ला' व 'एक्स'चे मालक एलॉन मस्क यांनी केल्यानंतर फ्रीडमन यांच्याकडे जगाचे लक्ष वेधले गेले. विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा व राजकीय क्षेत्रांतील प्रथितयश व्यक्तींच्या मुलाखती ते घेतात आणि या मुलाखतींची बरीच चर्चादेखील होत असते. या मुलाखतीत मोदी यांनी म्हटले आहे की, टीका हा लोकशाहीचा आत्मा असून, माझ्यावरील टीकेचे मी स्वागतच करतो.

देशात हुकूमशाही आणली जात असल्याचे वक्तव्य अनेक विरोधी पक्षांचे नेते करत असले, तरी केवळ मोदींवर टीका केली, म्हणून आजवर कोणालाही तुरुंगात टाकण्यात आलेले नाही. निवडणूक प्रचाराच्या वेळी पंतप्रधान विरोधकांवर कठोर प्रहार करतात आणि त्याचे कोणी उत्तर दिले की, ते त्याचाही समाचार घेतात. लोकशाहीत हार आणि प्रहार होतच राहतात; परंतु स्वपक्षातील नेत्यांनीही लक्ष्मणरेषा ओलांडून चुकीच्या भाषेत वक्तव्ये केली, तर त्यांचे कानही मोदी पिळतात. आत्मशोधासाठी दोन वर्षे हिमालयात भटकंती केली. या प्रवासाने आत्मिक शक्ती शोधण्यास आपल्यास सक्षम बनवल्याची माहिती पंतप्रधानांनी मुलाखतकारास दिली. कोणत्याही देशात सत्ताधीशावर हल्ले होतच असतात. मोदी त्याने खचून जात नाहीत. एकाग्रतेने आणि निर्धारपूर्वक ठरवलेल्या दिशेनेच ते वाटचाल करत आहेत, हाच अर्थ या मुलाखतीतून काढावा लागेल. पाकिस्तानबरोबर शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रत्येक प्रयत्नाला वैर आणि दगाबाजीने उत्तर मिळाले. इस्लामाबादेत बसलेल्या नेत्यांना आज ना उद्या शहाणपण येईल आणि ते शांततेचा मार्ग पत्करतील, अशी अपेक्षाही पंतप्रधानांनी व्यक्त केली. पाकिस्तानातील सामान्य जनतेला शांतता हवी असल्याचे त्यांचे निरीक्षण योग्यच आहे. वास्तविक, पहिल्यांदा पंतप्रधानपदाच्या शपथविधी सोहळ्याच्या वेळी मोदी यांनी पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांना आमंत्रण देऊन सर्वांना धक्काच दिला होता. २०१५ मध्ये मोदी यांनी रशिया व अफगाणिस्तानच्या दौर्‍यावरून भारतात परतताना अचानकपणे लाहोरमध्ये उतरून शरीफ यांची भेट घेतली आणि त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छाही दिल्या; परंतु त्यांच्या या कृतीस पाकिस्तानकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. उलट पठाणकोट, ऊरी, पुलवामा अशा ठिकठिकाणी पाकिस्तानने दहशतवादी कारवाया केल्या. आता हा देश अंतर्गत दहशतवादाच्या आगीत जळत असला, तरीदेखील त्याबद्दल तो भारतासच दूषणे देत आहे. अशा या पाकिस्तानबद्दल कोणालाही सहानुभूती उरलेली नाही.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' या धोरणाचे मोदी यांनी कौतुक केले आहे. गेल्या दहा वर्षांत भारतानेही 'इंडिया फर्स्ट' असेच धोरण राबवले असून, त्यादृष्टीने निर्धारपूर्वक वाटचाल सुरू केली आहे. आज जगात संयुक्त राष्ट्रासारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांचे महत्त्व ओसरू लागले असून, जागतिकीकरणाचा जसा चांगला परिणाम होतो, तसा फटकाही बसू शकतो. त्यामधूनच राष्टवादी भावना जागवल्या जात असून, हे जगात अमेरिकेपासून सर्वत्र दिसते. ट्रम्प यांनी छेडलेल्या व्यापारी युद्धाची झळ भारतालाही बसणार असली, तरीदेखील त्यांना मोठेपण देत भारताने आपले हित साधणे फायद्याचे आहे. ट्रम्प यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत मोदी नेमके हेच साधू इच्छित असावेत. कारण, अमेरिकेविरुद्ध आक्रस्ताळ व आक्रमक पवित्रा धारण केल्यास भारताचा शेतीमाल व अन्य निर्यात वस्तूंच्या व्यापारास तडाखा बसण्याची शक्यता आहे. चीनबरोबर भारताचे प्राचीन काळापासून संबंध असून मतभेदांचे रूपांतर संघर्षात होऊ नये, असे प्रतिपादन मोदी यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्याचे चीननेही स्वागत केले आहे.

गेल्या काही महिन्यांत चीन व भारत यांचे संबंध बर्‍यापैकी निवळले आहेत. भारत ही गौतम बुद्ध आणि महात्मा गांधींची भूमी आहे. आम्ही संघर्षापेक्षा सुसंवादाचे समर्थन करतो. जिथे शांतता प्रस्थापित करण्यासाठी मध्यस्थीची गरज आहे, तिथे आनंदाने ती जबाबदारी आम्ही स्वीकारतो, हे पंतप्रधानांचे मुलाखतीतील उद्गार आश्वासकच मानावे लागतील. या मुलाखतीला व्यक्तिगत स्पर्शही होता. स्वामी विवेकानंद आणि छत्रपती शिवाजी महाराज ही आपली दोन प्रेरणास्थाने असल्याचे त्यांनी नमूद केले. एवढे असामान्य जीवन त्यांनी कसे घडवले असेल, हे जाणून घेण्यासाठी मी नेहमी स्वतःवर प्रयोग करतो. यातील बरेचसे प्रयोग हे माझ्या शारीरिक क्षमतेची कसोटी पाहणारे असतात, असे त्यांनी मनमोकळेपणाने सांगितले. आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रसारमाध्यमांना खास मुलाखती देऊन आपली धोरणदिशा अधोरेखित करणे हे आजच्या माहिती प्रस्फोटाच्या काळात खूप महत्त्वाचे ठरते. भारताच्या पंतप्रधानांना नवीन तंत्रज्ञान, माध्यमे व समाजमाध्यमांची उत्तम जाण आहे. देशातील १४० कोटी लोक हीच आपली ताकद असल्याचे सांगताना मोदी यांनी भारतीय लोकशाहीचा विद्यमान चेहरा या माध्यमातून पारदर्शकपणे जगासमोर ठेवला आहे.

# पुरंदरचा विमानतळ



पुण्यात लोहगाव खेरीज पुरंदरला आणखी एक विमानतळ होणार असल्याची चर्चा गेले कित्येक वर्ष सुरू आहे. पुरंदरचा विमानतळ आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा असून तेथून मोठ्या प्रमाणावर मालवाहतूक होईल, निर्यातीला चालना मिळेल, दुष्काळी भागाच्या विकासाला गती मिळेल वगैरे चर्चा अनेक वर्ष आपण ऐकत आलो आहोत. जशी ही चर्चा जोर धरू लागली तसे तेथे जमीनसंपदानाला विरोध करणारे आंदोलन सुरू झाले. या विमानतळाला आधी केंद्र, राज्य सरकारच्या पातळीवरून मंजुरी मिळाली, नंतर त्यात काही तांत्रिक अडचणी आल्या. पुन्हा नवीन जागा शोधण्याचा खटाटोप झाला, मग पुन्हा मूळ जागाच निवडली गेली, असा सगळा दोलायमान प्रवास करीत या विमानतळाचे रखडलेले गाडे अखेर मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या विमानतळाच्या भूसंपादनासाठीची अधिसूचना नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली आहे. या विमानतळासाठी पूर्वी वनपुरी, उदाची वाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव येथील जागा निश्चित करण्यात आली होती, त्यानुसार त्याच ठिकाणच्या जागेच्या संपादनाची अधिसूचना जारी झाली आहे. म्हणजे यात एक गोष्ट तर निश्चित झाली की विमानतळ पूर्वी ठरलेल्या ठिकाणीच होणार आहे. या सात गावातून वेगवेगळ्या क्षेत्रफळाच्या जमिनी संपादित केल्या जातील. विमानतळासाठी एकूण भूसंपादन २६७३ हेक्टर इतक्या जागेचे केले जाणार आहे. या विमानतळाच्या मुख्य सुविधेबरोबरच तेथे मल्टी मॉडल लॉजिस्टिक हब प्रस्तावित आहे. एकंदर या प्रकल्पाचा आवाका लक्षात घेतला तर, खूप प्रचंड खर्चाचा हा प्रकल्प आहे. त्यात भूसंपादनाला लागणारा खर्चही मोठाच आहे. हा विषय मुद्दाम उल्लेख करण्याचे कारण असे की केंद्र आणि राज्य सरकार या दोन्ही पातळीवरची सरकारे त्यांच्या सध्याच्या आर्थिक स्थितीनुसार फार मोठा भांडवली खर्च करायला राजी नसतात. परंतु तरीही हा महत्त्वाच्या योजनेसाठीचा जो घाट घातला गेला आहे त्यातून महाराष्ट्रात एक मोठी पायाभूत सुविधा उपलब्ध होईल हे खरे आहे. त्याचा लाभ राज्याला निश्चितपणे होईल, पण विषय असा आहे की या विमानतळाला या आधीच खूप उशीर झाला असून, आता मात्र सरकारने त्याबाबत वेगाने उचल खाल्ली पाहिजे. सध्या राज्यात डबल इंजिनचे सरकार आहे. त्यामुळे दोन्ही सरकारे अतिशय समन्वयाने या विमानतळाचे काम खूप वेगाने मार्गी लावतील अशी अपेक्षा करायला हरकत नाही. पुणे शहराचे सध्याचे नागरी नियोजन पूर्ण कोलमडले आहे. वाहनांच्या तुलनेत शहरात रस्ते नाहीत, लोहगावच्या विमानतळाच्या विकासाला मर्यादा आहेत, कारण हा विमानतळ हवाई दलाच्या हद्दीत येतो. त्यामुळे पुण्यालागत नव्या विमानतळाची अत्यंत निकड होतीच. पुरंदर तालुक्यात हा विमानतळ होणार असल्याने आता पुणे शहराच्या नागरी विकासाचे केंद्र त्या तालुक्याच्या आसपास सरकेल अशी शक्यता आहे. पुण्याची वाढ त्या भागाच्या दिशेने झाली तर मध्य पुण्यातल्या गर्दीचे विकेंद्रीकरण होण्यास मदतच होईल. हा प्रस्तावित विमानतळ पूर्वी चाकणनजीक होणार होता. पण तेथेही या विमानतळाच्या जागा संपादनाला विरोध झाला त्यामुळे तेथील काम रखडले, पण तेथील जागा जवळपास निश्चित झाली होती. त्यामुळे तिकडे जमिनीचे भाव वधारले होते आणि विमानतळ व्हायच्या आधीपासूनच तेथे खाजगी विकासाला चालना मिळाली होती. पण पुणे आणि मुंबई या दरम्यान सध्याच मोठी जागा टंचाई निर्माण झाली असून आता येथे अधिक विकासाला वाव उरलेला नव्हता. पुण्याला लगत असलेल्या पिंपरी चिंचवड, तळेगाव, चाकण हा सगळा भाग खूप आधीपासून गजबजलेला आहे. खंडाळा घाट ओलांडल्यानंतर मुंबई शहरापर्यंतचा सर्व परिसर औद्योगिक वसाहती आणि अनेक छोट्या-मोठ्या प्रकल्पाने गजबजलेला आहे, त्यात पुन्हा या चाकणला नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळाची भर पडली असती तर विकासाचे नियोजन करताना मोठीच तारांबळ उडाली असती. त्या तुलनेत पुरंदरची जागा सोयीची आहे असे तज्ज्ञांचे म्हणणे पडले. त्यानुसार तेथे हा प्रकल्प आता सुरू होत आहे. भूसंपादनाची अधिसूचना जारी झाली ही एक तांत्रिक बाब आहे, पण त्यानंतर भूसंपादनासाठी शेतकर्‍यांना नुकसान भरपाई किती देणार हा कळीचा मुद्दा उपस्थित होणार आहे. समृद्धी महामार्ग किंवा रिंग रोडच्या धरतीवर भूसंपादन केले जाणार आहे असे सरकारचे म्हणणे आहे, म्हणजे त्या रेटनुसार पुरंदरच्या शेतकर्‍यांना नुकसान भरपाई मिळणार आहे. यावर त्या शेतकर्‍यांचे मत आजमावून घेणे आवश्यक ठरेल. मुळात कोणताही प्रकल्प राबवताना स्थानिक जनतेला विश्वासात घेणे, त्यांना दिलासा मिळेल अशा तरतुदी करणे, भूसंपादनाची समाधानकारक नुकसान भरपाई देणे असे सगळे प्रकार करावे लागतात. याबाबत शासन किती वेगाने आणि कार्यक्षमपणे कार्यरत राहील हे पाहणे महत्त्वाचे आहे. मुळात वर नमूद केल्याप्रमाणे या मोठ्या खर्चाच्या प्रकल्पाला केंद्राकडूनही तातडीची आणि पुरेशी आर्थिक मदत होणे गरजेचे आहे. सुदैवाने पुण्याचे मंत्री याच विमान खात्याचे मंत्री आहेत, त्यामुळे त्यांची मदत या कामी उपयोगी ठरणार आहे. वरील सगळे योग छान जुळून आले आहेत. त्यामुळे विकासाच्या एका नव्या टप्प्याच्या दिशेने पुणे जिल्हा अग्रेसर झालेला पाहायला मिळणार असेल तर कोणालाही आनंदच होईल. या विमानतळाच्या प्रकल्पाने उशिरा का होईना एकदाचे टेकऑफ घेतले आहे, आता ही भरारी अशीच वेगाने सुरू राहू दे एवढीच इच्छा.

# राजकीय धुळवड

'बुरा ना मानो होली है'च्या नावाखाली कोणत्याही प्रकारची चेष्टामस्करी करण्याचा परवाना दिला असला, तरी राजकारणात मुरलेल्या राजकीय नेत्यांनी होळीच्या निमित्ताने अशा प्रकारची चेष्टामस्करी करावी का, हा मात्र वादाचा विषय ठरू शकतो. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या एका विधानामुळे विनाकारणच खळबळ माजली आणि नंतर आपण गमतीने हे विधान केले असा खुलासा त्यांनी केला. त्यांच्या या विधानांवर ज्या विविध प्रतिक्रिया व्यक्त झाल्या त्या पाहता राजकारणात अशाप्रकारे केलेली गंमत कशी विचित्र ठरू शकते हे सिद्ध झाले.

सध्याच्या महायुतीच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री पदावर असलेले शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनी आमच्या सोबत यावे आम्ही त्यांना आळीपाळीने मुख्यमंत्री करू अशा प्रकारची ऑफर नाना पटोले यांनी दिली होती. सध्या महाविकास आघाडीमध्ये किंवा काँग्रेस पक्षामध्ये कोणत्याही महत्त्वाच्या पदावर नसलेल्या नाना पटोले यांना अशा प्रकारची ऑफर देण्याचा अधिकार आहे की नाही हा जरी वेगळा विषय असला तरी त्यांनी दिलेल्या या ऑफरनंतर ठाकरे शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी तातडीने प्रतिक्रिया देऊन नाना पटोले यांनी ही ऑफर जाहीर करून घाई केली असे म्हटले. एवढेच नाही तर खूप पूर्वीच एकनाथ शिंदे काँग्रेससोबत जाण्यास तयार होते आणि त्यांनी केंद्रातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अहमद पटेल यांची भेटही घेतली होती अशा प्रकारचे विधानही केले.





या विषयाची व्याप्ती वाढू लागल्यानंतर नाना पटोले यांनी सारवासारव करण्याच्या निमित्ताने आपण होळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर गंमत केली आणि ते विधान सीरियस नव्हते अशा प्रकारचा खुलासा केला. तरी या गमतीच्या निमित्ताने संजय राऊत यांनी जो दावा केला तो तर त्यांना मागे घेता येणार नाही. मुळात शिवसेना फोडून एकनाथ शिंदे भाजपबरोबर जाऊन मुख्यमंत्री झाले होते. साहजिकच एकनाथ शिंदे त्यावेळी खरोखरच काँग्रेससोबत जाण्यास तयार होते का आणि त्यांनी अहमद पटेल यांची भेट घेतली होती का हासुद्धा संशोधनाचा विषय ठरू शकतो. अर्थात, संजय राऊत आपल्या दररोजच्या पत्रकार परिषदेमध्ये कोणत्या ना कोणत्या विषयावर नेहमीच प्रतिक्रिया व्यक्त करत असतात. तशाच प्रकारची प्रतिक्रिया त्यांनी नाना पटोले यांच्या या ऑफरच्या विधानावरही दिली असावी. काळाच्या ओघात त्या प्रतिक्रियाही मागे पडतात. नाना पटोले यांनी केलेल्या या विधानाची दखल काँग्रेसच्या नेत्यांनीही घेतली आणि अनेकांना ही गंमत आवडलेली नाही हे त्यांच्या देहबोलीवरूनही सिद्ध होते. मुळात नाना पटोले प्रदेशाध्यक्षपदावर असताना त्यांनी या प्रकारचे विधान केले असते, तर त्याला काही अर्थ प्राप्त झाला असता. पण इतर कोणत्याही नेत्यांना विश्वासात न घेता त्यांनी अशा प्रकारचे विधान केल्यामुळे नाराजी निर्माण होणे साहजिक आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे जरी ही ऑफर गंभीर होती असे मानले तरी महाविकास आघाडीचे इतर घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्याकडून एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे स्वागत झाले असते का, हे कसे गृहीत धरता येईल? तरीही संजय राऊत यांनी आपल्या नेहमीच्या शैलीमध्ये या ऑफरवर प्रतिक्रिया व्यक्त करून जी मुळात गंमत होती ती गंमत अधिकच ताणण्याचा प्रयत्न केला. अनेक वेळा आपल्या राजकीय नीतीचा भाग म्हणून राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते संभ्रमाचे वातावरण निर्माण करत असतात. यानिमित्ताने जी चर्चा निर्माण होते त्यामुळे काही काळ खळबळ माजते आणि संशयाचे वातावरण वाढू लागते. त्याचाच एक भाग म्हणून या सर्व राजकारणाच्या गमतीकडे पहावे लागणार आहे. एकनाथ शिंदे यांनी या गमतीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना काँग्रेस सोबत जाण्याचा प्रश्नच नाही असे म्हटले.

अजित पवार यांनी मात्र याबाबत काहीही भूमिका घेतलेली नाही. कारण या प्रकारच्या गमतीकडे दुर्लक्ष करण्याचेच त्यांनी आजपर्यंत धोरण स्वीकारले आहे. एकीकडे राजकारणातील ही गंमत सुरू असतानाच दुसरीकडे शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते जयंत पाटील यांनीसुद्धा अशाच प्रकारची गंमत सुरू केलेली दिसते.

'माझे आता मन लागत नाही. मला फारसे महत्त्वही नाही' अशा आशयाचे विधान त्यांनी पक्षाच्या व्यासपीठावरूनच केले आहे. एकीकडे जयंत पाटील लवकरच शरद पवारांची साथ सोडून अन्य कोणत्या पक्षामध्ये जातील अशा प्रकारची चर्चा सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर जयंत पाटील यांचे हे विधानही सूचक मानावे लागेल. अर्थात, अजूनतरी जयंत पाटील यांनी आपण गमतीने ते विधान केले असे म्हटलेले नाही आणि जयंत पाटील यांची नाराजीसुद्धा लपून राहिलेली नाही. सध्या सत्तेवर असलेली महायुती भक्कम असल्याने उर्वरित पाच वर्षे आपल्याला विरोधी बाकांवरच बसावयाचे आहे याची कल्पना असल्यानेच केवळ स्वप्नरंजन म्हणून अधूनमधून राजकारणात अशी गंमत केली जाते असे दिसते.

सोशल मीडियाचा प्रभाव असलेल्या सध्याच्या जगामध्ये काय खरे आणि काय खोटे याचे भान नसणारे सोशल मीडियाचे वापरकर्ते मात्र अशा प्रकारच्या गमतीवर विश्वास ठेवून ती सीरियसली घेतात आणि समाजात आणि राजकारणात विनाकारण संभ्रमाचे व संशयाचे वातावरण निर्माण होते हेसुद्धा या ठिकाणाहून नाकारून चालणार नाही. राजकारण गंमत नसून सीरियस आहे हे यानिमित्ताने सर्व राजकारण्यांना कळले तरी खूप झाले.




## मधुमेहाच्या रुग्णांसाठी वरदान ठरेल कच्ची पपई, नियमित सेवन केल्यास शरीराला होतील आश्चर्यकारक फायदे




भारतासह जगभरात मधुमेहासारख्या गंभीर आजाराने अनेक लोक त्रस्त आहेत. मधुमेह झाल्यानंतर रक्तातील साखरेचे प्रमाण झपाट्याने वाढू लागते. शरीरात दिसणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यामुळे शरीरातील इतर अवयवांना सुद्धा इजा होते. त्यामुळे मधुमेहाची लक्षणे शरीरात दिसू लागल्यानंतर तातडीने डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करावे. यामुळे शरीरात वाढलेली साखरेची पातळी नियंत्रणात राहील. याशिवाय मधुमेह झाल्यानंतर डॉक्टरांच्या गोळ्या औषधांसोबतच घरगुती पदार्थांचे सुद्धा सेवन करावे. या पदार्थांच्या सेवनामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते आणि आरोग्याला अनेक फायदे होतात. मधुमेहाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यामुळे दृष्टी जाणे, जखम लवकर बरी न होणे, तणाव इत्यादी अनेक समस्या उद्भवू शकतात.

शरीरात वाढलेला मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी रोजच्या कच्ची पपई खावी. कच्ची पपई खाल्यामुळे रक्तातील साखर नियंत्रणात राहते. तसेच आरोग्याला देखील अनईक फायदे होतात. कच्ची पपई हे आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक फळ आहे. मात्र आपल्यातील अनेकांना कच्ची पपई खाल्यामुळे शरीराला नेमके काय फायदे होतात हे माहित नसेल. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला कच्ची पपई खाल्यामुळे आरोग्याला नेमके काय फायदे होतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर:

मधुमेहाच्या रुग्णांसाठी कच्ची पपई खूप फायदेशीर आहे. यामध्ये पपेन नावाचे एंजाइम असते जे शरीरातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी मदत करते. मधुमेहाच्या रुग्णांनी नियमितपणे कच्च्या पपईचे सेवन केले तर रक्तातील साखरेचे प्रमाण कायमच नियंत्रणात राहील आणि आरोग्यासंबंधित कोणतीही समस्या उद्भवणार नाही.

पचनसंस्था मजबूत होते:

कच्च्या पपईचे सेवन केल्यामुळे बिघडलेली पचनसंस्था मजबूत होते आणि आतड्यांचे आरोग्य सुधारते. कच्ची पपई खाल्यामुळे शरीरात साचून राहिलेले हानिकारक घटक बाहेर पडून जातात आणि शरीराची पचनक्रिया सुधारते. त्यामध्ये असलेले फायबर आणि पपेन पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता, गॅस आणि इतर पचन समस्या कमी करते.

वजन कमी होते:

वाढलेले वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी रिकाम्या पोटी कच्च्या पपईचे सेवन करावे. कच्च्या पपईच्या सेवनामुळे शरीरातील चरबी वितळून जाते आणि शरीरातील चरबीचे प्रमाण कमी होते. यामध्ये असलेले फायबर आणि पाण्याचे प्रमाण शरीराची भूक नियंत्रणात ठेवते. तसेच पपई किंवा पपईचा रस प्याल्यास लवकर भूक लागत नाही.

त्वचा सुधारते:

कच्ची पपई त्वचा सुधारते. कारण त्यामध्ये असलेले विटामिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स, त्वचा निरोगी आणि चमकदार बनवतात. कच्च्या पपईची पेस्ट बनवून त्यात दूध आणि हळद घालून चेहऱ्यावर लावू शकता. यामुळे चेहऱ्यावर खूप चमक येते. निस्तेज किंवा कोरडा झालेला चेहरा सुधारण्यासाठी पपईचे नियमित सेवन करावे.

# लघवी करताना आग होते? 'हे' घरगुती उपाय केल्यास तात्काळ मिळेल आराम, मुतखडा पडेल लघवीतून बाहेर

चुकीच्या जीवनशैली, जंक फूडचे अतिसेवन, शरीरात निर्माण झालेला पाण्याचा अभाव, अपुरी झोप इत्यादी अनेक गोष्टींचा आरोग्यावर लगेच दिसून येतो. त्यामुळे रोजच्या आहारात शरीराला पचन होणाऱ्या पौष्टिक आणि पचनास हलक्या असलेल्या पदार्थांचे सेवन करावे. किडनीसंबंधित समस्या वाढू लागल्यानंतर शरीराला हानी पोहचते. शरीरात पाण्याची कमतरता निर्माण झाल्यानंतर किंवा जास्त वेळ लघवी थांबवून ठेवल्यामुळे किडनी स्टोन होण्याची शक्यता असते. किडनी स्टोन झाल्यानंतर पोटामध्ये असह्य वेदना होऊ लागतात. या वेदनांकडे दुर्लक्ष केल्यामुळे स्टोनचा आकार वाढतो आणि किडनीचे आरोग्य बिघडते.

किडनी स्टोन झाल्यानंतर सुरुवातीच्या दिवसांमध्ये जाणवणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यामुळे स्टोनचा आकार वाढतो. मोठ्या आकाराचा स्टोन काढण्यासाठी शस्त्रक्रियाच करावी लागते तर आकाराने लहान असलेला किडनी स्टोन घरगुती उपाय करून पडून जातो. किडनी स्टोनची समस्या उद्भवू लागल्यानंतर लघवी करताना जळजळ होणे, पाठदुखी, ओटीपोटात तीव्र वेदना, आणि लघवीतून रक्त येणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी आज आम्ही तुम्हाला काही घरगुती उपाय सांगणार आहोत. हे घरगुती उपाय केल्यास





लघवीतून किडनी स्टोन बाहेर पडून जाईल आणि आराम मिळेल.

जवाच्या पाण्याचे सेवन करावे:

जवाच्या पाण्यात असलेले गुणधर्म किडनीमधील स्टोन बाहेर काढून टाकण्यासाठी मदत करतो. याशिवाय किडनीमध्ये असलेले टॉक्सिन्स आणि स्टोन बाहेर पडून जाण्यासाठी मदत होते. यासाठी एक ग्लास पाण्यात २ चमचा जव टाकून काहीवेळ पाण्यात भिजत ठेवा. त्यानंतर तेच पाणी टोपात टाकून व्यवस्थित उकळवून घ्या. उकळवून घेतलेले पाणी तुम्ही थंड करून पिऊ शकता. या पाण्याचे सेवन करून किडनीमधील स्टोन एक दोन आठवड्यात बाहेर निघून जाईल. या पाण्याच्या सेवनामुळे किडनीचे सर्व आजार बाहेर होतात.

कुळीथ दाण्याचे सेवन:

आयुर्वेदामध्ये कुळीथ दाण्याला विशेष महत्व आहे. या दाण्याच्या सेवनामुळे शरीराला आवश्यक घटक देखील मिळतात. कुळीथ दाण्याच्या सेवनामुळे किडनीमधील स्टोन लघवीवाटे बाहेर पडून जाईल. आठवड्यातून दोन ते तीन वेळा कुळीथ डाळीचे सेवन केल्यास किडनी स्टोनचा धोका कमी होतो. याशिवाय दैनंदिन आहारात कुळीथ डाळीचे सेवन करणे आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहे.

लिंबू पाणी:

लिंबामध्ये असलेले घटक आरोग्याच्या दृष्टीने अतिशय प्रभावी आहेत. लिंबू पाण्याचे सेवन केल्यामुळे किडनीमधील स्टोन विरघळून जातो. शिवाय शरीराला अनेक फायदे देखील होतात. यामध्ये आढळून येणारे सायट्रिक ॲसिड किडनीमधील साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी मदत करतो. त्यामुळे किडनी स्टोनच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी लिंबू पाण्याचे सेवन करावे.







# मराठवाड्यासह लातूर जिल्हाभरात विविध कार्यक्रम

लातूर : प्रतिनिधी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचा आज दि. २१ मार्च रोजी वाढदिवस आहे त्यांच्या वाढदिवसानिमित्त मराठवाड्यासह लातूर जिल्हा भरात सामाजिक उपक्रम आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

लातूर शहरानजीकच्या मळवटी येथील ट्वेंटीवन शुगर्स कारखान्याच्या वतीने आज माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी शिबिराचे व हभप आकाश देशमुख महाराज यांच्या कीर्तन होणार आहे. या कीर्तन कार्यक्रमानंतर महाप्रसाद ही वाटप करण्यात येणार आहे तर लातूर शहरातील पोद्दार हॉस्पिटल अक्सीडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने अस्थिरोग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष श्रीशैल उटगे यांच्या पुढाकारातून माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त औसा नगरीचे ग्रामदैवत श्री मुक्तेश्वर मंदिरात मुक्तेश्वराचा रुद्राभिषेक सोहळा सकाळी ८ वाजता होईल त्यानंतर सायंकाळी ६ वाजता औसा येथील आझाद चौकातील विविध कार्यकारी सोसायटी नूतन कार्यालय येथे दावत-ए- इफ्तारचे आयोजन करण्यात आले आहे.



लातूर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. किरण जाधव यांच्या पुढाकारातून कोल्हेनगरमधील गणेश मंदीरात सर्वरोग निदान व उपचार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रम आरोग्य शिबिरामध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विविध संस्था पदाधिका-यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोणी ग्रामसेवक दाखवता का हो? ग्रामसेवकांची मुख्यालयाला दांडी,

किनवट:शेख शौकत :-कुणी ग्रामसेवक दाखवता का हो, असा आर्त टाहो ग्रामीण भागातील जनता फोडताना नागरिक दिसत आहेत. प्रशासनातील ग्रामपातळीवर महत्त्वाचा दुवा असलेले तालुक्यातील अनेक ग्रामसेवक मुख्यालयाला दांडी मारत पसार झाले असल्याने नागरिकांना ग्रामसेवक मिळणे दुरापास्त बनले आहे. जनता फोडताना सध्या ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्या सुरु असल्याने पाणीटंचाई निवारणासाठी ग्रामसेवकाची उपस्थिती महत्त्वाची आहे. ग्रामीण भागातील जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रामुख्याने ग्रामसेवक यांच्यावर असते. तालुक्यातील अनेक ग्रामसेवक या परिस्थितीचे भान न ठेवता मुख्यालयाला दांडी मारत असल्याचे निदर्शनास येत आहे. नागरिक ग्रामसेवकांना भेटण्यासाठी तालुका स्तरावर आले असता तिथेही त्यांना भेटत नाही. अनेक ग्रामसेवक मंडळी व अनेक डिपार्टमेंटचे कर्मचारी जिल्ह्याच्या ठिकाणी व नांदेड, पुसद, यवतमाळ असे मोठ्या शहरात राहतात.तर गत तीन वर्षापासून जि.प., पं.स. व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका न झाल्याने प्रशासक राज सुरू आहे. पंचायत समितीवर कुणाचाही अंकुश राहिला नाही. याचा गैरफायदा प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी घेत असल्याचे दिसत आहे. सर्व सामान्य नागरिकांना पंचायत समितीच्या कामासाठी आले असता संबंधित अधिकारी व कर्मचारी वेळेवर भेटत नसल्याने गटविकास अधिकारी जिल्ह्यातून ये-जा करतात व राहून आठ दिवसांत एकदा मुख्यालयास भेट देतात. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तालुक्यातील ग्रामसेवक मंडळींना मुख्यालयी हजर राहण्याबाबत आदेशित करावे, प्रत्येक ग्रामपंचायत पंचायत कार्यालयात बायोमेट्रिक प्रणाली सुरू करण्यात यावी, आदेशाचे पालन न करणाऱ्या ग्रामसेवकाविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाया करण्यात याव्या, अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांनी केली आहे. या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष देण्याची गरज आहे.

# माहूर नगरपंचायत ला ५० लाख रुपयाचे बक्षीस तत्कालीन मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड यांच्या प्रयत्नांना यश,

किनवट: शेख शौकत :-माहूर तहसील कार्यालयात नायब तहसीलदार म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावलेले नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड यांचे कडे तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी काही काळापुरता मुख्याधिकारी म्हणून पदभार सोपविला होता या काळात त्यांनी शासनाच्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत सर्वच बाबतीत उत्कृष्ट कार्य केल्याने शासनाकडून छत्रपती संभाजी नगर विभागीय स्तरावर दुसऱ्या क्रमांकाचे विजेते पद व ५० लक्ष रुपयांचे बक्षीस जाहीर करून डॉ राजकुमार राठोड यांचे फोटो शासकीय वेबसाईटवर टाकून त्याचे अभिनंदन केल्याने माहूर शहरवासी यातून त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने माझी वसुंधरा अभियान अंतर्गत स्पर्धा ठेवण्यात आली होती, या स्पर्धेत प्रत्येक नगरपंचायतने सहभाग घेतला होता. माहूरचे नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी, उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड यांचे सर्व नगरसेवक, नगरसेविका कडून अभियानात नायब तहसीलदार तथा तत्कालीन मुख्याधिकारी डॉ. राजकुमार राठोड यांनी शासकीय निकषाप्रमाणे प्रत्येक काम लोकसहभागातून तसेच कर्मचाऱ्याकडून उत्कृष्टरित्या करून घेतल्याने माहूर शहरात माझी वसुंधरा अभियान सक्सेसफुल ठरले होते याची दखल शासनाने घेऊन शासकीय निकषाप्रमाणे १५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरपंचायत साठी ही स्पर्धा होती यामध्ये माहूर नगरपंचायत मुख्याधिकारी डॉ. राजकुमार गोविंदराव राठोड यांनीअभियान कालावधीत ०१ हजार पेक्षा अधिक देशी वृक्षांची लागवड करण्यात आली असून, त्यांचे व यापूर्वी लागवड केलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्यात आले आहे.वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी ०३ हजार पेक्षा अधिक देशी वृक्ष असलेली रोपवाटिका तयार करण्यात आली आहे.सणासुदीच्या वेळेस होणारे जल प्रदूषण रोखण्यासाठी गावात कृत्रिम विसर्जन कुंड तयार करण्यात आले असून निर्माण होणाऱ्या निर्माल्य पासून उत्तम प्रतीचे कंपोस्ट खत बनविले जात आहे. त्यामुळे नगरपंचायतीस स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत ओ डी एफ मानांकन प्राप्त झाले आहे असे शासकीय वेबसाईटवर जाहीर करण्यात आले आहे सोबतच अभियानाच्या जन जागृतीसाठी शहरात आय लव यू हे चकाकणारे सेल्फी पॉईंट बसविण्यात आले आहेत.शहरात ठीक ठिकाणी माझी वसुंधरा तत्वे दर्शवणाऱ्या बाबींच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसिध्दी करण्यात आली आहे. तसेच सर्व पथदिव्या च्या खांबावर तिरंगा दर्शविणारे लाइट्स बसविण्यात आले आहेत माहूर नगरपंचायतीने माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबाबत त्यांचे मनः पूर्वक अभिनंदन करत शासनाच्या निकषाप्रमाणे माहूर नगरपंचायतने तंतोतंत कामगिरी बजावल्याने शासनाचा वेबसाईटवर वरील प्रकारे नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड यांचे फोटो टाकून अभिनंदन करण्यात आले आहे. या अभियानात नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी ,उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड ,कार्यालय अधीक्षक वैजनाथ स्वामी यांचे सर्व अधिकारी कर्मचारी व तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतल्याने नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड यांनी महाराष्ट्र शासनासह सर्व पदाधिकारी अधिकारी कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत.




# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात कुस्तीपटू विष्णू तातपूरे आणि महेश तातपूरे यांचा सत्कार संपन्न

लातूर :- संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागून असलेल्या लातूरचे ग्रामदैवत सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थान यात्रेतील कुस्ती स्पर्धेत रायगड ग्रुपचे अमर कोकाटे यांच्याकडून दिले जाणारे ५१ तोळे चांदीचे कडे महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील विष्णू तातपूरे आणि केतन हलवाई यांच्यावतीने दिले जाणारे २१ तोळे चांदीचे कडे महेश तातपूरे यांनी जिंकले. त्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्य प्रोफेसर डॉ. संजय गवई यांच्या हस्ते शाल आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. आशिष क्षिरसागर, डॉ. यशवंत वळवी, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. रवींद्र सुरवसे, डॉ. विजयकुमार सोनी, डॉ. मनोहर चपळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विष्णू तातपूरे आणि महेश तातपूरे यांनी संपादन केलेल्या उज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे आणि इतर सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, क्रीडा विभागातील सर्व सदस्य यांच्यासह, उपप्राचार्य, विभाग प्रमुख, शाखा समन्वयक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.



# ११६ किलो गांजा वाहनासह जप्त. तेलंगाना, ओडिसा व औसा येथील तीन आरोपीवर गुन्हा दाखल. १५ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त. पोलीस ठाणे औसा ची कारवाई.

११६ किलो गांजा वाहनासह जप्त. तेलंगाना, ओडिसा व औसा येथील तीन आरोपीवर गुन्हा दाखल. १५ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त. पोलीस ठाणे औसा ची कारवाई

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १९ मार्च रोजी औसा पोलीस ठाणे चे पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांना गोपनीय माहिती मिळाली की, महात्मा फुलेनगर, औसा येथे एक व्यक्ती त्याचे साथीदारसह राहते घरामध्ये स्वताच्या आर्थिक फायदयासाठी मानवी आरोग्यास अपायकारक असलेला मादक पदार्थ गांजा अवैधरित्या ताब्यात बाळगुन त्याची चोरटी विक्री करीत आहे. सदरची माहिती वरीष्ठांना कळवून शासकीय पंचसह महात्मा फुलेनगर,औसा येथे १६.२६ वाजता छापा मारला. सदर ठिकाणी एक संशयीत स्कार्पीओ वाहन क्रमांक ए.पी. २० एन. ३६३७ दिसुन आली. त्यामध्ये दोन इसम रमेश आर यादाईह, वय ४५ वर्ष रा. ओबलपुर, जाफरगड वरगंल राज्य तेलंगणा. निबास लक्ष्मीकांत बडइ, वय ५४ वर्ष रा. एमपीव्ही ८२ मलकागिरी, मलाभरम राज्य ओडिसा.

असे मिळून आले सदर वाहनाची झडती घेतली असता सदर वाहनात मध्ये गांजाचे प्लॉस्टीकने रॅपींग केलेले पॉकीटे व मोबाईल मिळाले. त्यादोघाकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सदरचा गांजा परशुरामदेविदासकांबळे,रा.फुलेनगरऔसा.

याने आमच्याकडून विकत घेतला असल्याचे सांगितले. त्यावरून परशुराम कांबळे यांचे घराची झडती घेतली असता त्याच्या घरातपण पाच प्लॉस्टीकच्या गोण्या मध्ये लाहन मोठ्या आकाराचे प्लॉस्टीकने रॅपींग केलेले पॉकीटे व गाडी मध्ये मिळून आलेले असे एकुण ६७ गांजाची पॉकिटे मिळून आले.

११६.१४ किलो ग्रॅम वजानाचा ओला व सुखा गांजा, एक सिल्वर ब्लॅक रंगाची महिंद्रा स्कार्पीओ क्रमांक ए.पी. २० एन. ३६३७, दोन मोबाईल फोन असा एकुण १५,८१,४०० रुपयेचा माल मिळून आल्याने नमूद आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे औसा येथे गुरनं. १०८/२०२५ कलम २० गुगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून दोन आरोपीतांना सदर गुन्हयात अटक करण्यात आलेली असून एक आरोपी परशुराम देविदास कांबळे राहणार फुलेनगर औसा हा फरार आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक लातूर, श्री.सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक लातूर डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी औसा कुमार चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे, प्रमोद बोंडले, सफौ. संजय कांबळे, पोलीस अंमलदार रामकिशन गुटे,मुबाजोददीन सय्यद, मोतीराम घुले, भरत भुरे, गोविंद पाटील, बालीका सरवदे यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.




# महाबँक व्यवस्थापन आजच्या संपातून सुद्धा आडमुठेच राहिले तर आंदोलन उग्र करून बेमुदत संप करावा लागेल. कॉ. धनंजय कुलकर्णी.

लातूर :- मागील तीन ते चार वर्षापासून सातत्याने निवेदने, धरणे आंदोलने, निदर्शने तसेच अनेक वेळा संप करून सुद्धा आवश्यक तितक्या प्रमाणात बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये सर्व संवर्गात नोकर भरती होत नाही. बँक ऑफ महाराष्ट्र चे वरिष्ठ व्यवस्थापन अहंकारयुक्त दर्पाने आंधळे, मुके आणि बहिरे झाले आहे. यांना बँकेच्या उच्च परंपरा,बँकेचे मालक असलेली जनता आणि ग्राहकांचे होणारे हाल, अपुऱ्या कर्मचारी अधिकारी वर्गामुळे त्यांच्या वरील तणाव याकडे मुजोरपने दुर्लक्ष देवून आपल्याच मस्तीत वागत आहे. त्यामुळे या पुढील काळात महाराष्ट्र बँकेतील संघटनेस बेमुदत संप सुद्धा करावा लागला तर त्यास जबाबदार बँकेचे चेअरमन आणि वरिष्ठ व्यवस्थापन जबाबदार असेल, असा इशारा महाबँक कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय नेते कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी दिला. आज या बँकेत एक दिवसाचा इशारा संप लातूर शहरात कर्मचाऱ्यांनी निदर्शने करून पूर्ण यशस्वी केला. त्यावेळी निदर्शक बँक कर्मचाऱ्यापुढे बोलताना पुढे ते म्हणाले की,अपुऱ्या कर्मचारी अधिकारी संख्येचा विपरीत तात्काळ परिणाम ग्राहक सेवे वरती होताना दिसून येतो आहे. ग्राहकांना अनेक वेळ ताटकळत रांगेत उभारावे लागत आहे. बँक गेली अनेक वर्षे प्रचंड नफा कमावून उत्कृष्ट कामगिरी करीत आहे, मग या नफ्याच्या बदल्यात ज्या ग्राहकांच्या जीवावर हा नफा कमावला जातो, त्या ग्राहकांना निकृष्ट सेवा देण्याचे दुष्ट धोरण, शोषण करणारे धोरण बँक व्यवस्थापनाने अवलंबीने, हा ग्राहकांचा अवमान आणि कृतघ्नपणा आहे. त्यामुळे उत्कृष्ट सेवेसाठी ओळखल्या जाणाऱ्या बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये ग्राहक सेवेचे बारा वाजलेले आहेत. त्यामुळेच ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र फेडरेशन या ए आय बी ई ए शी संलग्न असलेल्या संघटनेने बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकर भरती या प्रमुख मागणी साठी २० मार्च २०२५ रोजी संपाची हाक दिली असल्याचे बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांच्या आजारपणासाठी,प्रमुख सांसारीक व आवश्यक गरजांसाठी रजा मिळत नाहीत. अनेक शाखा मध्ये शिपाई नाहीत.त्यामुळे तेथील शिपायांची कामे कंत्राटी पद्धतीने करून घेतली जातात, जे ग्राहकांच्या ठेवीदारांना धोकादायक आहे.मागील दहा वर्षात अनेक नवीन शाखा उघडल्या गेल्या व बँकेचा व्यवसाय ही अनेक पटीने वाढलेला आहे परंतु कर्मचाऱ्यांची संख्या मात्र कमी झाल्याचे दिसून येते आहे.ऑल इंडिया फेडरेशनने तात्काळ नोकर भरतीची मागणी केलेली आहे त्यासाठी आजचा संप अटळ बनल्याचेही कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले.

बँकेचे व्यवस्थापन मनमानी पद्धतीने बँक चालवू पाहतआहे.संघटनासोबत केलेल्या करारांचे पालन बँकेकडून केले जात नाही. संघटनांचे ताब्यात घेतलेले ऑफिसेस सुद्धा बँकेच्या व्यवस्थापनाकडून संघटनांना परत दिले जात नाहीयेत. त्यामुळे एकूणच या मनमानी, दादागिरी व हुकूमशाही कारभाराविरोधात संघटनांनी आजचा संप पुकारल्याचे सेक्रेटरी कॉ. दीपक माने यांनी सांगितले. आजचा संप ही व्यवस्थापनाच्या दादागिरी, मनमानी विरोधात व नोकर भरतीच्या प्रमुख मागण्यासाठी होऊ घातलेल्या संघर्षाची सुरुवात असल्याचे व येथून हा लढा आणखी तीव्र बनत जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. उत्तम ग्राहक सेवेसाठी नोकर भरती या प्रमुख मागणीसाठी करीत असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र मधील या संपास ग्राहकांनी पाठिंबा द्यावा असे आवाहन यावेळी उपाध्यक्ष कॉ.उत्तम होळीकर यांनी केले.

यावेळी बँकेच्या मिनी मार्केट येथील लातूर मुख्य शाखे समोर जमून जिल्हाभरातील ५० ते ६० कर्मचाऱ्यांनी हातात मागणी फलक घेऊन व मुजोर व्यवस्थापनाचे विरोधात घोषणा देऊन दणदणीत संप साजरा केला. यावेळी कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. महेश घोडके, कॉ. उदय मोरे, कॉ. प्रकाश जोशी, कॉ. बालाजी मुळजे, महिला कर्मचारी नेत्या कॉ. रेश्मा भवरे, कॉ. संजीवनी गोजमगुंडे, कॉ.ऐश्वर्या उदावंत यासह जिल्हाभरातून सर्व कर्मचारी उपस्थित होते. आज बँकेच्या जिल्यातील सर्व १५ शाखांचे कामकाज ठप्प होते. यावेळी इतर बँकेतील कर्मचारी संघटनांनी प्रत्यक्ष येऊन या संपास पाठिंबा व्यक्त केला.




**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM PUSHPA SURESH YERNALE TO PUSHPA SANDIPAN YERNALE HENCE FOR THIS DECLARATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE PUSHPA SANDIPAN YERNALE IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY HUSBAND AND CHILDREN AND FAMILY.
OLD NAME : PUSHPA SURESH YERNALE
NEW NAME: PUSHPA SANDIPAN YERNALE
ADD: SHABITWADI,TA.NILANGA SHABITWADI,POST-HARIJAWALGA DIST-LATUR-413607

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE